26) भारतीय संविधान: स्त्रीयांचा सहभाग
प्रा.डॉ. भालेराव जी.पी., सेनगांव ||108

27) भारतीय संविधान आणि सामाजिक न्याय
प्रा.एस.जी. तळणीकर, सेनगाव ||111

28) भारतीय संविधान आणि भारतातील अल्पसंख्याक समाज
प्रा.डॉ. बालाजी किशनराव पाटील, अहमदपूर ||114

29) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना:एक अभ्यास
प्रा.डॉ. श्यामसुंदर पंढरीनाथ वाघमारे, परभणी ||116

30) केंद्र–राज्य संबंधाचे बदलते स्वरूप आणि राज्यपालाची भुमिका
बोंबले राजु बालासाहेब & डॉ. सुळसुळे शोभा राजाभाऊ, लातूर ||120

31) भारतीय संविधान आणि वर्तमानकालीन स्थिती
प्रा.डॉ.संतोष हंकारे, जि.परभणी ||123

32) भारतीय संविधान आणि न्यायालयीन सक्रियता
भंडे सरस्वती सोपान, नांदेड ||126

33) भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण
भिकाणे शोभा राजेंद्र, परभणी ||128

34) भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्य आणि भारतीय नागरिक
प्रा.म्हेत्रे भाग्यशाला किशनराव, अहमदपूर ||130

35) भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्य आणि भारतीय नागरिक
सौ. गिरी माधुरी गोविंद ||132

36) भारतीय संविधानातील मुलभुत अधिकार
प्रा.डॉ. सुचिता बबनराव जाधव, जि. लातूर ||134

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

नियतकालिक, १९७७.

□□□

30

# केंद्र–राज्य संबंधाचे बदलते स्वरूप आणि राज्यपालाची भुमिका

**बोंबले राजु बालासाहेब**
ग्रंथपाल,
हु.ज.पा.महाविद्यालय हिमायतनगर, नांदेड

**डॉ. सुळसुळे शोभा राजाभाऊ**
ग्रंथपाल,
मा.गा. महाविद्यालय अहमदपुर, लातूर

**********

**सार :–**

संघराज्यात्मक रचनेवर नियोजनाचा विपरीत परिणाम झाला असल्याची टीका केली जाते. खरे पाहता केंद्र व राज्ये यांच्यातील आर्थिक संबंधाचा अंपायर अशी त्याची भुमिका घटनेत ठरविली आहे. तत्वत: सल्लागार असलेल्या या मंडळाचे प्रत्यक्षात अधिकार फार मोठे आहेत. केंद्रीय मंत्रीमंडळाचा आदेश घटकराज्य झुगारू शकतात. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. कारण तसे केले तर त्यांची फार मोठी किंमत मोजावी लागेल. याची त्यांना पुरेपुर जाणीव असते अर्थिक सत्तेची सुत्रे केंद्राच्या हाती असल्यामुळे राज्याच्या धोरणावर अप्रत्यक्षपणे केंद्र प्रभाव पाडू शकते. केंद्र सरकार व राज्य सरकार यातील प्रशासकीय संबंधाचा दुवा राज्यपाल असतो. राज्यपाल हा वास्तविक राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून कार्य करत असतो.


**पार्श्वभुमी :–**

भारतासारख्या लोकशाही देशामध्ये आज मोठया प्रमाणात झपाटयाने विकास होत आहे. आणि या देशामध्ये २९ घटकराज्य आहे. तसेच एकुण ०७ केंद्रशासित संघराज्य आहे ऐवढया मोठया देशाची राज्यघटना लिहीनारे थोर पुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

राज्य व केंद्रमध्ये अंत्यतसवेदनशिल असे संबंध प्रस्तापित असणे म्हत्वाचे होय. त्यांच प्रमाणे केंद्र व राज्य यांचा दुवा म्हणुन प्रत्यक्ष राज्यपाल हा भुमिका निभावत असतो. २०२१ हे शतक विज्ञान युंग म्हणुन ओळखले जाते. एक प्रकारे वैज्ञानिक दुष्टीकोन ठेवुन तत्वज्ञान तसेच केंद्रसुची व राज्यसुची यांना धरून विकसनशील होत आहे. ही मुख्यत्वे महत्वाची बाब होय.

**केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप**

संघराज्यसाठी फेडरेशन ऐवजी युनियन ऑफ स्टेट्स हा शब्द राज्यघटनेत वापरला आहे. असे असले तरी संघराज्याची सर्व वैशिष्टे भारतात. आढळून येतात म्हणून भारत हे एक संघराज्य आहे. भारत हा राज्याचा संघ आहे. India that is Bharat shall be a union of states अशा प्रकारचा उल्लेख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करतांना ते म्हणाले की, भारत हे एक संघराज्य आहे.



**१. आर्थिक निधी :—**

भारताच्या आकस्मिक खर्चाचा निधी राष्ट्रपतींच्या आणि घटक राज्यांच्या आकस्मिक खर्चाचा निधी राज्यपालांच्या ताब्यात असतो. आकस्मिक असे आर्थिक संकट निर्माण झाल्यास केंद्रामध्ये खर्चाच्या विनियोग करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आणि राज्यपालाला आहे. परंतू भारताचा आकस्मिक खर्चाचा निधी वापरतांना राष्ट्रपती भेदभाव निर्माण करतो. अशी टिका काही जणांनी केली आहे. ज्या राज्यात विरोधी पक्ष सत्तारूढ आहे. त्या राज्यात आकस्मिक खर्चाची तरतूद करतांना केंद्र सरकार फार कंजुषी करते.

**२. केंद्र सरकारची कार्य राज्य सरकारवर सोपविणे:—**

भारतीय संविधानाच्या कलम २५८ नुसार केंद्र सरकारच्या कक्षेत येणाऱ्या एखादया बाबीसंबंधीचे कामे राष्ट्रपती घटक राज्याच्या संमतीने त्या सरकारकडे किंवा त्यांच्या अधिकाऱ्याकडे सशर्त किंवा बिनशर्त सोपवू शकतो. उदा. सार्वत्रिक निवडणूकांच्या वेळी संसद सदस्यांच्या निर्वाचनाचे कार्य राज्य सरकारच्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात येते. अशा कार्यासाठी करावयाचा खर्चाचा भार केंद्र सरकारच सहन करते. कलम २५८ क प्रमाणे संविधानाच्या ७ व्या विशोधनानुसार घटक राज्य सरकारदेखील केंद्र सरकारच्या संमतीने केंद्र सरकारांडे किंवा अधिकाऱ्यांकडे काही कामे सोपवू शकते.

**३. पाण्यासंबंधिचे तंटे आणि राज्यारात्यातील समन्वय :—**

भारतातील काही नदया अनेक घटक राज्यांच्या हद्दीतुन वाहतात. त्या नद्यांचे पाणी आपआपल्या शेती साठी किंवा विज उत्पादनासाठी वारण्याची इच्छा प्रत्येक राज्याला होणे स्वाभाविकच आहे. अशा वेळी नदीच्या पात्रातील पहिल्या क्रमांकाच्या राज्यांना जास्त फायदा मिळण्याची शक्यता असते. कारण ते राज्य नदीचे पाणी पुढील राज्यात जाण्यापुर्वीच आपल्या हद्दीत कालवे किंवा वीजप्रकल्प काढू शकतात. त्यामुळे राज्याराज्यात तंटे निर्माण होण्याची शक्यता असते. अशा प्रकारची तंटे कलम १३१ प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाकडे नेता येतील. पण पाण्याच्या वाटपाचे तंटे हे फक्त कायद्याच्या दृष्टीकोनातुन सोडवाचे नसतात. अशा तंटयात निरनिराळया राज्यांच्या आर्थिक विकासाचा प्रश्न अंतर्भुत असतोच पण त्याचबरोबर भारतातील निरनिराळया राज्यांचा समतोल कसा विकास व्हायला पाहिजे हाही प्रश्न अंतर्भूत असतो. संसदेने याप्रमाणे १९५६ मध्ये आंतराष्ट्रीय जलतंटे अधिनियम संमत केला आहे. याप्रंमाणे राज्या राज्यातील एका विशिष्ट बाबीसंबंधी तंटे मिटविण्याची तरतूद २६२ व्या कलमात केली आहे. उदा. कृष्णा नदीचा पाणीवाटवाचा प्रश्न महाराष्ट्र, आंध्राप्रदेश, कर्नाटक या तीन राज्याशी निगडित आहे.

**४. आखिल भारतीय नोकऱ्यांची तरतूद :—**

भारतीय संविधानाने केंद्र आणि राज्य सरकारमध्ये अलग अलग नोकरांच्या सेवेची व्यवस्था केली आहे. काहि सेवा दोन्ही सरकारांना सारख्याच सरूपात आवश्यक ठरतात. केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे प्रशासकीय अधिकारी आपआपल्या अधिकार क्षेत्रात कार्य करतात. संविधानाच्या कलम ३१२ नुसार संसदेला राष्ट्रीय हिताच्या दश्ष्टीकोनातुन केंद्रसरकार व राज्य सरकार यांना उपयुक्त ठरणाऱ्यासेवा निर्माण कराण्याचा अधिकार दिलेला आहे.

**५. अनुदान :—**

प्रत्येक घटकराज्याची स्वतंत्र अर्थव्यवस्था असली तरी स्वत:च्या गरजांची पुर्तता घटक राज्याला पूर्ण करता येतेच असे नाही. संघ सरकार घटक राज्याला त्यासाठी अनुदान देते. ही अनुदान राशी संसद कायद्याद्वारे निश्चित करते. त्याशिवाय संविधानाने विशेष कार्यासाठी घटक सरकारांना केंद्राकडून विशेष अनुदान देण्याचीही व्यवस्था केली आहे.

**६. घटकराज्य सरकारांना मार्गदर्शक करणे :—**

भारतीय संविधनाच्या २५६ व्या कलमानुसार संसदेने केलेल्या आणि त्या राज्यांना लागू होणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करणे हे घटक राज्यांच्या शासनाचे कर्तव्य ठरते. घटक राज्यांनी कार्यकारी सत्तेचा वापर कशाप्रकारे करावा यासंबंधीचे केंद्र सरकार त्यांना आदेश देते. त्या आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी राज्यावर असते. १९७६ च्या ४२ व्या विशोधनुसार असेही नमूद केले आहे की, घटक राज्यात जेव्हा कायदा आणि सुव्यवस्था यासंबंधी गंभीर प्ररिस्थिती निर्माण होते, तेव्हा केंद्र सरकार आपले सशस्त्र दल त्या घटक राज्यात पाठवू शकते.

**७. संमिश्र सरकारे :—**

सन १९६७ च्या निवडणुकीत पंजाब, हरीयाणा, उत्तरप्रदेश, ओरिसा, बंगाल, मद्रास, आणि केरळ या घटक राज्यात संमिश्र सरकारे अस्तित्वात आली. त्यामुळे केंद्र आणि घटक सरकारमध्ये आर्थिक संघर्ष निर्माण झाला. ही संमिश्र सरकारे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बाबतीत केंद्रशी जुळते घेण्यात तयार नव्हती. परंतु सरकारणे त्यांची फारशी दखल घेतली नाही. उलट काळा बाजार रोखण्यासाठी व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कायम राखण्यासाठी १९७९ ला राष्ट्रपतींनी वृट्हुकुम काढला. त्याला सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्याचा विरोध होता. परंतू अशा वटहुकूमाद्वारे केंद्राने आपली आर्थिक सत्ता मजबुत केली.

**राज्यपालाची भुमिका :—**

केंद्र सरकारने गेल्या ६० वर्षाच्या राजकारणात आपल्या राजकिय पक्षांचे हितसंबंध जोपासण्यासाठी राज्यपाल पदाचा वापर केलेला आहे. राज्याच्या विविध राज्यपालांनी आपली सद्सद्विवेकबुद्वी न वापरता केंद्र सरकारच्या आदेशानुसार निर्णय घेतलेले दिसतात. त्यामुळे घटक राज्यांच्या स्वायत्तेवर आणि अधिकरांवर आक्रमण झालेले आहे. राज्यपाल हा राज्याचा कार्यकारी प्रमुख असला तरी त्याची नियुक्ती, बदली व पदच्युतीचे अधिकार, राष्ट्रपतीला असतात. वास्तविक तो राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून कार्य करतो आणि त्यांची मर्जी असे प्रर्यंत आपल्या पदावर राहतो.

केंद्र सरकार व राज्य सरकार यातील प्रशासकीय संबंधाचा दुवा राज्यपाल असतो. परंतू राज्यपालाने आपल्या विवेकधिकाराचा वापर परिस्थितीनुसार न केल्यास तोच आरोपास पात्र ठरतो. १९५७ साली नेहरूंच्या काळात केरळधील कम्युनिस्ट सरकार मुदतीपूर्वीच बरखास्त करण्यात आली होती.

केंद्र सरकार व राज्य सरकार यातील प्रशासकीय संबंधाचा दुवा राज्यपाल असतो. म्हणून राज्यपालाची भुमिका हि अत्यंत म्हत्वाची होय.

विधीमंडळाचे अधिवेशन बोलविणे विधीमंडळाच्या सभागश्हाची अधिवेशने बोलावणे, तहकूब करणे, विधानसभा बरखास्त करणे हि म्हत्वाची कामे योग्य रितीने हाताळयाची भुमिका राज्यपाल निभावत असतो.

अध्यादेश काढण्याचा अधिकार राज्यपालाना होय. ही भुमिका योग्यरित्तीने राज्यपालच करू शकतो.

विद्यापीठाचा कुलपती हा राज्यपाल हा राज्यातील राष्ट्रीय विद्यापीठाच्या व्यतिरीक्त सर्व विद्यापीठाचा कुलपती म्हणून काम पाहतो ही म्हत्वाची भुमिका राज्यपाल निभावतो. राज्यातील सर्व विद्यापीठाच्या कामकाजांवर तो नियंत्रण ठेवण्याची भुमिका निभावतो.

प्रसासकीय कामामध्ये मुख्यतो न्यायधिशांना

शपत देण्याचे, पदभार स्विकारण्याचे प्रमाणिक राहून कर्तव्य पालनांची शपथ देण्याची राज्यपाल भुमिका निभावतो.?

संदर्भसुची

१. भारताचे शासन आणि राजकारण — डॉ. देशमुख आलका

२. भारतीय शासन व राजकारण — डॉ. बिरमल नितीन, डॉ. पवार वैशाली

३. भारताचे संविधान — गायकवाड प्रदिप

४. भारतीय प्रशासन आणि राजकारण — डॉ. पाटिल वा. भा.

५. भारतीय शासन आणि राजकारण — प्रा. लांडगे पंडित

६. www.google.com

७. www.yahoo.com

८. www.maharashtratimes.com

❑❑❑

31

# भारतीय संविधान आणि वर्तमानकालीन स्थिती

प्रा.डॉ.संतोष हंकारे
मराठी विभाग प्रमुख,
पु.अ.होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव, ता.गंगाखेड, जि.परभणी

**********

भारतीय संविधान हा मानवनिर्मित ग्रंथ असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने तो निर्माण केलेला ग्रंथ आहे. हा ग्रंथ केवळ राज्यव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणारा कायद्याचा ग्रंथ नसून समग्र भारतीयांच्या कल्याणाचा विचार करणारा ग्रंथ आहे. समग्र मानवजातीसाठी विज्ञानवादी विवेकशील बुध्दीवादाच्या कसोटीवर टिकणारा मानवी कल्याणाचा विचार भारतीय संविधानात आहे. भारतीय संविधानाने या देशातील प्रत्येक व्यक्तीला विचार, उच्चार, श्रध्दा, धर्म आणि उपासना याचा स्वमतानुसार उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. संविधानाच्या उद्देश पत्रिकेत प्रारंभीला दिलेले स्वातंत्र्य मुलभूत अधिकाराच्या रुपाने पुढे भारतीय संविधानात साकार झाले आहे. भारतीय संविधानाला सामाजिक आशय आणि उच्चतम अशा मानवी मूल्यांची अद्वितीय जोड दिली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानाने संविधानातील प्रत्येक तरतूद प्रकाशमान झाली आहे.त्यामुळे भारतीय संविधान हा केवळ कायद्याचा ग्रंथ नसून तो समग्र भारतीयांच्या उन्नतीचा विचार करणारा एक महत्त्वपूर्ण असा पवित्र आचार ग्रंथ आहे.समग्र भारतीय जनता ही संविधनाचा केंद्रबिंदू आहे. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात 'मी' चा कुठेही उल्लेख न करता 'आम्ही भारतीय जनता ही घटना आमच्यासाठी तयार करून ती मान्य आणि स्वीकृत करीत आहोत. ती स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.'असे शब्दप्रयोग केले आहेत. भारतीय संविधानाचे श्रेय त्यांनी समग्र भारतीय जनतेला दिले आहे आणि भारतीय जनतेचे सार्वभौमत्व संविधानाने मान्य केले आहे. तेंव्हा समग्र भरतीयांच्या दृष्टीने ही गोष्ट अत्यंत उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण आहे. कारण यावरून हेच स्पष्ट होते की, भारतीय संविधानाचे उगमस्थान भारतीय जनताच आहे.म्हणून संविधानाचे रक्षण,संवर्धन करण्याची जबाबदारी ही प्रत्येक भारतीयांची आहे.तेंव्हा प्रत्येक भारतीय माणसाने संविधानाप्रती आदर व्यक्त केला पाहिजे.